नि. दि. दावा क. २४२/२०१५
नि. क. ४८
**(CNR No. MHWR02001238-2015)**

## निशाणी क. ४८ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादी क. २ यांनी त्यांना कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

प्रतिवादी क. २ यांच्या अर्जातील कथन थोडक्यात असे :-

२. वादीने सदरचा दावा प्रतिवादीं विरुध्द भुमापन क. २० वरील बांधकाम बेकायदेशीर असल्याबाबतचा हुकुमनामा होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा दावा शासनाला पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी आहे, परंतु प्रतिवादी क. २ यांनी आतापर्यंत त्यांचे कैफियत अभिलेखावर दाखल केले नाही. त्यांना त्यांचे कैफियत दाखल करावयाचे आहे. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क. २ ने केली आहे.

३. प्रतिवादी क. २ च्या सदर अर्जास वादीने त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे देवुन सदरच्या अर्जामध्ये नमुद केलेले कारण योग्य नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचे युक्तीवादावरुन व दाखल कागदपत्रावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क. २ यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर दावा हा शासनाला पक्षकार म्हणून सामील करण्यासाठी प्रलंबीत होता, त्यामुळे ते कैफियत मुदतीत दाखल करु शकले नाही. सदरचा अर्ज मंजुर केल्यास त्याचा कोणताही विपरीत परिणाम वादीचे हक्कावर होणार नाही. सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी प्रतिवादी क. २ यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते. जर प्रतिवादी क. २ यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही तर त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादी क. २ यांनी कैफीयत दाखल करण्यास विलंब केलेला आहे, त्यामुळे

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020012382015/truecopy/order-2.pdf
www.ecourtsindia.com

त्यांच्यावर रक्कम रू. ५००/-(पाचशे रूपये फक्त) खर्च लावुन अर्ज मंजुर करणे योग्य होईल असे मला वाटते. सबब, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे व त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज रक्कम रू. ५००/- (पाचशे रूपये फक्त) खर्च लावुन मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(श्रीमती एस.पी.बाबर)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वर्धा.

दिनांक :- १७/०१/२०१९

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020012382015/truecopy/order-2.pdf